MHSO010034082023

| | | |
|---|---|---|
| **दाखल तारीख** | - | **२२.११.२०२३** |
| **नोंदणी तारीख** | - | **२३.११.२०२३** |
| **निकाल तारीख** | - | **२१.०७.२०२६** |
| **कालावधी** | - | **२ व. ७ म. २८ दि.** |

**तदर्थ जिल्हा न्यायाधीश – २ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी – श्री. ओमशंकर शिवराज पाटील)**

**दिवाणी किरकोळ अपिल क्र.११५/२०२३** **निशाणी क्र.८**

श्रीमती ध्रुपदाबाई ऊर्फ द्रुपदाबाई ऊर्फ द्रोपती
पति विठ्ठल गाडेकर. ,
वय – ७८ वर्षे, धंदा – शेती,
रा - वडजी, ता. दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर
} अपिलार्थी

**<u>वि रु द्ध</u>**

१. श्री बालाजी पिता गोविंद गाडेकर,
वय -४५ वर्षे, धंदा - मजूरी
२. श्री किशोर पिता गोविंद गाडेकर
वय – ३६ वर्षे धंदा - मजुरी
दोघे राहणार – वडजी, ता. दक्षीण सोलापूर,
जिल्हा सोलापूर
३. श्री शिवाजी पिता शंकरराव जाधव,
वय – ७० वर्षे, धंदा शेती
राहणार – ६०/३०, अनुसया, कॉम्प्लेक्स,
मराठा वस्ती, भवानी पेठ, सोलापूर .
} उत्तरार्थी

**अपिलार्थीतर्फे विधिज्ञ** – श्री एम.एन.श्रीखंडे

**उत्तरार्थी क्र.१ व २ तर्फे विधिज्ञ** – श्री एन.ए.ठोकडे

**उत्तरार्थी क्र.३ विरुध्द एकतर्फा**

**न्यायनिर्णय**

(घोषित दिनांक – २१/०७/२०२६)

नियमित दिवाणी दावा क्रमांक ५५९/२०२३ मध्ये विद्वान सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर यांनी दिनांक ०९/१०/२०२३ रोजी निशाणी क्रमांक ५ वरील तात्पुरत्या मनाईहुकुमाचा अर्ज नामंजुर केल्याच्या आदेशाने व्यथित झाल्याने अपिलार्थी/वादींनी प्रस्तुतचे अपील सादर केलेले आहे. (या प्रकरणातील अपिलार्थी व उत्तरार्थी यांना सोयीसाठी मूळ दाव्यातील वादी आणि प्रतिवादी असे संबोधण्यात येत आहे.)

**वादीची बाजु**

२. थोडक्यात वादीचे असे म्हणणे आहे कि, वादपत्रातील परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमूद दावा मिळकत ही पूर्वी उमाकांत झिंगाडे यांची होती. श्री. झिंगाडे यांनी दावा मिळकत बलवंत कोले यांना दिनांक २५/०५/१९९९ रोजी दस्त नंबर १०६७/१९९९ प्रमाणे विक्री केलेली होती. बलवंत कोले यांनी प्रतिवादी क्रमांक ३ शिवाजी जाधव यांना दिनांक १७/०७/२०१३ रोजी दस्त नंबर ३९३३/२०१३ प्रमाणे दावा मिळकत विक्री केलेली होती. तसेच प्रतिवादी नं. ३ श्री शिवाजी जाधव यांनी प्रतिवादी क्रमांक १ बालाजी गाडेकर व प्रतिवादी क्र. २ किशोर गाडेकर यांच्या नांवे नोंदणीकृत विना मोबदला बक्षीसपत्र नंबर ५१५६/२०१३ दिनांक

२५/०९/२०१३ रोजी केलेले होते.

३. वादीचे पुढे असे म्हणणे आहे कि, वादी व त्यांचे पती विठ्ठल दादाराव गाडेकर दावा मिळकत देखभाल करण्याचे काम उमाकांत झिंगाडे यांच्यापासून करत आलेले होते. तसेच बलवंत कोले यांनी जमीन खरेदी केल्यानंतर सुध्दा दावा मिळकतीची देखभालीचे काम वादी व त्यांचे पति विठ्ठल हे करीत होते. वादी व त्यांचे पति विठ्ठल यांचा प्रतिवादी क्रमांक ३ शिवाजी जाधव यांच्याशी सुध्दा स्नेहभाव संबंध चांगला होता. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक ३ शिवाजी जाधव यांनी वादी व त्यांचे पति यांच्या पालनपोषणासाठी तसेच दैनंदिन जिवण व्यवस्थित जगता यावे म्हणून दावा मिळकत वादी वयोवृध्द झाल्याने पालनपोषण करण्यासाठी वादी व त्यांचे मयत पति विठ्ठल यांच्या ताब्यात दिली होती. तसेच सदर दावा मिळकतीमधून येणा–या उत्पन्नावर वादी व त्यांच्या पतीची उपजिवीका चालू होती.

४. वादींचे पुढे असे म्हणणे आहे कि, दावा मिळकतीत आजही वादी यांचाच कब्जा आहे. दावा मिळकतीवर देखभालीचे काम वादी व त्यांचे मयत पति विठ्ठल गाडेकर करत असल्याने त्यावर त्यांचाच कब्जा होता. परंतु वादी व त्यांचे मयत पति विठ्ठल यांचे वय झालेले होते व त्यांना मुलगा नाही. वादी व त्यांचे मयत पति विठ्ठल यांनी गट नंबर ३८ मधील शेतजमीनी मध्ये देखभाल केल्याने ४ एकर जमीन पालनोषण करण्यासाठी व उपजिवीकेसाठी त्यांच्या मेहनतीची कदर म्हणून विना मोबदला बक्षिस देण्याचे ठरविले होते. त्याप्रमाणे वादी व त्यांचे मयत पति विठ्ठल त्यांच्या कौशल्यपूर्ण कामामुळे त्यांच्या मेहनतीची कदर म्हणून व पालनपोषण व उपजिवीकेसाठी दावा मिळकत वादी व त्यांच्या मयत पतिच्या ताब्यात होते व क्षेत्र कायमस्वरुपी

विना मोबदला बक्षिस म्हणून दिले. दावा मिळकत वादी यांना गट नंबर ३८ मधील शेतामध्ये इमानदारीने काम केल्याने त्यांनी शेती दिनांक १७/०७/२०१३ रोजी घेतल्यानंतर त्याच दिवशी मालकी हक्काने विना मोबदला बक्षिस म्हणून ताब्यात दिली. सदर दावा मिळकत वादी यांना त्यांच्या गुणवत्तेमुळे कौशल्यपूर्ण कामामुळे व इमानदारीमुळे व्यक्तीगत कष्टातून पालपोषणसाठी स्त्रीधन म्हणून ताब्यात मिळालेली मिळकत असल्याने सदरची मिळकत ही वादी यांच्या संपूर्णपणे मालकी हक्काची मिळकत आहे.

५. परंतू वादी व त्यांचे मयत पती विठ्ठल यांना मुलगा नसल्याने वादी व त्यांचे पती यांनी प्रतिवादी क्रमांक ३ यांना बक्षिसपत्राचा दस्त प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या नांवे नाममात्र हक्काचा (Otensible Owner) लिहून देण्यास सांगितले. सदरचा दस्त पोकळ होता. कारण सदर विना मोबदला बक्षीसपत्र प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्या नांवे करण्याअगोदर त्यांना स्पष्टपणे सांगितले होते की, 'सदर दावा मिळकत ही वादी व त्यांच्या मयत पतिस त्यांच्या पालनपोषण व उपजिविकेसाठी प्रतिवादी क्रमांक ३ बक्षिस देणार आहे'. परंतु वयोमानाप्रमाणे आयुष्याचा भरवसा नसल्याने दावा मिळकतीचे विना मोबदला बक्षिसपत्र वादीचे पुतणे प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्या नावे प्रतिवादी क्रमांक ३ यांनी लिहून दयावे अशी विनंती केली होती. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी वादी व त्यांच्या मयत पतिस त्यांच्या हयातीपर्यंत सांभाळ करण्याबाबत अट घातली होती. ती प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी मान्य केलेली होती. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक ३ यांनी दावा मिळकतीचे विना मोबदला बक्षिसपत्र दस्त क्र. ५११५६/२०१३ प्रमाणे दि. २५/०९/२०१३ रोजी प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्या नांवे नोंदवून दिले. परंतु, सदर विना

मोबदला बक्षिसपत्रामध्ये सुध्दा स्पष्टपणे नमूद आहे की, सदरची मिळकत ही वादी व त्यांचे मयत पति विठ्ठल गाडेकर यांनी गट नं. ३८ मधील शेतजमीनीमध्ये देखभाल केल्याने त्यांच्या हयातीपर्यंत पालनपोषण, औषधपाणी, जेवणखान, कपडालत्ता, आजारपणाचा खर्च प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी करावयाचा होता. सदरचे बक्षिसपत्र हे केवळ वादी व त्यांच्या मयत पतिच्या कौशल्यपूर्ण कामाचा मोबदला म्हणून दिल्याने वादीच्या मयत पतीच्या मृत्यूनंतर वादीची एकटीची मिळकत आहे. सदर दस्तामध्ये दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना दिलेला आहे असे जरी नमूद असले तरी सदरची बाब चुकीची आहे. कारण दावा मिळकतीवर मागील ४० वर्षांपासून वादी यांचाच कब्जा होता व आहे व तो आजही कायम आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना दावा मिळकत विना मोबदला बक्षिसपत्राने देण्यात आली असली तरी सदर विना मोबदला बक्षिसपत्र हे पोकळ नाममात्र (Otensible Owner) आहे. कारण सदर दावा मिळकत विना मोबदला बक्षिस मिळाल्याने वादी हीच मालक आहेत. प्रतिवादी नं. १ व २ हे नाममात्र विना हक्काचे मालक (Otensible Owner) आहेत.

६. वादींचे पुढे असे म्हणणे आहे कि, जर प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी वादी व त्यांच्या पतीचा सांभाळ न केल्यास दावा मिळकत परत प्रतिवादी क्रमांक ३ यांना परत देण्याचे तोंडी ठरले होते. तसेच दावा मिळकत वादी अथवा त्यांचे पती यांच्या मृत्यूनंतर प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना उपभोग घेण्याचे नाही असे वाटले तर ती प्रतिवादी क्रमांक ३ विनामोबदला परत देण्याचे तोंडी ठरले होते. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी वादी व त्यांचे मयत पति विठ्ठल गाडेकर यांचा कधीही सांभाळ केलेला नाही. परंतू,

विनामोबदला बक्षिसपत्राचा दस्त नावावर असल्याने प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी वादी व त्यांचे मयत पति यांना सदर जमिनीमधील कब्जा सोडावा व मालकी हक्क सांगू नये म्हणून ब–याचवेळा दमदाटी करुन अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केलेली आहे. तसेच सदर प्रतिवादी क्रमांक १ व २ हे दावा मिळकतीचे उता–यावर नांव आहे म्हणून अनाधिकाराने दावा मिळकत गुपचुप लोकांना विकण्याच्या तयारीत आहेत. तसेच दि. ०४/०४/२०२३ रोजी वादी दावा मिळकतीमध्ये शेतीच्या कामामुळे गेलेल्या असतांना त्यावेळेस त्यांचा सोबत १. अरुण उध्दव कदम रा. वडजी व २. ज्ञानेश्वर भागवत शिरसट रा. सोलापूर हे लोक होते. त्यावेळेस प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी वादीच्या ताब्यास अडथळा करून धमकी दिली.

७. वादीचे पुढे असे म्हणणे आहे कि, वादीचे मयत पति विठ्ठल दादाराव गाडेकर दिनांक २६/१०/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. त्यामुळे या वादी एकटे आहेत. त्यामुळे अ) दावा मिळकत ही वादीस स्त्रीधन, तसेच कौशल्यपूर्ण कामासाठी बक्षिस व पालनपोषणासाठी मिळालेली मिळकत असल्याने ती वादी यांच्या पूर्ण मालकीची मिळकत आहे, असे जाहिर करण्यात यावे, ब) बक्षिसपत्र दस्त नं. ५१५६/२०१३ हा विनामोबदला, पोकळ, अनाधिकाराचा, नाममात्र मालकी हक्काचा (Otensible owner) असल्याने रद्दबातल आहे व वादी यांच्या मालकी हक्कावर बंधनकारक नाही, असे जाहीर होवून मिळावे, क) प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी दावा मिळकत कोणासही विक्री करु नये अथवा त्रयस्थ हक्क निर्माण करु नये आणि वादीच्या दावा मिळकतीमध्ये असलेल्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी हरकत अडथळा करु नये अशी निरंतर ताकीद देण्यात यावी,

यासाठी वादीने हा दावा दाखल करून या दाव्याच्या अंतिम निर्धारणापर्यंत प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी दावा मिळकत कोणासही विक्री करु नये अथवा त्रयस्थ हक्क निर्माण करु नये आणि वादीच्या दावा मिळकतीमध्ये असलेल्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता मनाईहुकुम पारीत करण्याची विनंती केली आहे.

**प्रतिवादी क्र. १ व २ यांचे म्हणणे**

८. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी निशाणी क्रमांक १७ वर त्यांची कैफियत आणि म्हणणे दाखल करून वादीचे सर्व आरोप अमान्य केलेले आहेत. थोडक्यात या प्रतिवादींचे असे म्हणणे आहे कि, यापूर्वी याच दावा शेतजमीनीबाबत प्रतिवादी क्रमांक ३ यांनी वादीच्या दोन विवाहीत मुली सौ. सुमन किसन घोडके व शांताबाई बिरु अट्टीवाले यांना प्रतिवादी क्रमांक ३ व ४ करुन प्रतिवादी क्रमांक १  व २ यांच्या विरुध्द सोलापूर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात दावा रे.मु.नं. २४४/२०१५ हा दावा दाखल करुन दिनांक २५/०९/२०१३ रोजीचे दावा शेतजमीनीचे बक्षिसपत्र बेकायदेशीर ठरवून मिळण्यासाठी मागणी केलेली होती. त्यादाव्यात वादीच्या दोन्ही मुली यांनी त्यांची कैफियत निशाणी ३७ ला दाखल करुन प्रतिवादी क्रमांक ३ यांच्या दाव्यास मान्यता दिलेली होती. तो दावा दिनांक २०/०२/२०२० रोजी गुणावगुणावरुन फेटाळला आहे. त्या हुकूमनाम्याविरुध्द प्रतिवादी क्रमांक ३ यांनी मा. जिल्हा न्यायाधीश सोलापूर यांच्या न्यायालयात दाखल केलेले सिव्हील अपील क्र. ६५/२०२० देखील आदरणीय जिल्हा न्यायाधीश यांनी दिनांक २१/०२/२०२३ रोजी फेटाळले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्रमांक ३ व वादीच्या मुली यांनी वादीस पुढे करुन

हा दावा दिनांक २९/०४/२०२३ रोजी दाखल केलेला आहे.

९. वादीने दाव्याचे कामी दिनांक २५/०९/२०१३ रोजीचे बक्षिसपत्र नाममात्र मालकी हक्काचा असल्याचे ठरवून मिळणेबाबत सुमारे ९ वर्षोपेक्षा जास्त कालावधीनंतर दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे वादीच्या दाव्यास मुदतीची बाधा आहे. वादीचे पती स्वत: विठ्ठल गाडेकर हे दिनांक २६/१०/२०२१ रोजी मयत झाले. त्यांनी त्यांच्या हयातीत सदर दावा शेतजमीनीचे बक्षिसपत्रबाबत कसलीही तक्रार केलेली नव्हती. तसेच दिनांक २५/०९/२०१३ रोजीच्या बक्षिसपत्राप्रमाणे प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी वादी व स्व. विठ्ठल गाडेकर यांचा सांभाळ पालनपोषण करत होते व आहेत. परंतू वादीने तिच्या दोन मुली १. सौ सुमन किसन घोडके व सौ. शांताबाई बिरु अट्टीवाले यांच्या दबावावरुन व त्यांचा दावा व अपील फेटाळल्यानंतर सदरचा खोटा दावा दाखल केलेला आहे. वादीस प्रतिवादी क्रमांक १ व २ हेच सांभाळ करत होते व आहेत.

१०. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्रमांक १ व २ यांचा कब्जा मालकी हक्काने दिनांक २५/०९/२०१३ रोजीपासून होता व आहे. प्रतिवादी क्रमांक १ व २ हे दावा शेतजमीन दिनांक २५/०९/२०१३ रोजीपासून अव्याहत वहिवाटीत आहेत. दावा दाखल करते दिवशी, त्यापुर्वी तसेच आजदेखील दावा शेतजमीनीत प्रतिवादी क्रमांक १ व २ यांचा मालकी हक्काने कब्जा असून दिनांक २५/०९/२०१३ रोजीचे बक्षिसपत्राआधारे दावा शेतजमीनीच्या ७/१२ उता-यावर प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्या नावाची नोंद आहे. तसेच शेतजमीनीचा सारा देखील प्रतिवादी क्रमांक १ व २ हेच भरत आलेले आहेत. वादीचा दावा शेतजमीनीत कब्जा नव्हता व नाही.

दि. २५/०९/२०1३ रोजीच्या बक्षिसपत्रातील मजकूराचा गैरफायदा वादीच्या मुली सौ. सुमन किसन घाडके व सौ. शांताबाई अट्टीवाले यांनी घेऊन वादीस पुढे करुन सदरचा दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे त्यांनी हा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

११. विद्वान संपरिक्षा न्यायालय यांच्या मते हिंदु वारस अधिनियमचे कलम १४ वादीला लागु होत नाही. बक्षीसपत्रान्वये वादीला केवळ उदरनिर्वाहाचा अधिकार आहे. वादीचा दावा मिळकतीवर ताबा नाही. त्यामुळे विद्वान संपरिक्षा न्यायालय यांनी आव्हानित केलेल्या आदेशान्वये वादीचा अर्ज नामंजुर केलेला आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुत अपिल दाखल केले आहे.

१२. विचारासाठीचे मुद्दे आणि त्यावरील माझे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खाली नमूद करीत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | तात्पुरता मनाईहुकुम पारीत करण्यासाठी आवश्यक अशा तिन्ही घटकांची पुर्तता वादीने केलेली आहे काय ? | नाही |
| २. | आव्हानित केलेल्या आदेशात हस्तक्षेप करणे आवश्यक आहे काय ? | नाही |
| ३. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**कारणमिमांसा**

**मुद्दे क्र. १ ते ३ करिता**

१३. वादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. श्रीखंडे यांनी असा जोरदार युक्तिवाद केला कि, वादी आणि तिचे पती यांना मुलगा नसल्याने त्यांचे

पालनपोषण करण्यासाठी दावा मिळकत ही प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना देण्यात आलेली आहे. त्यामुळे हिंदु वारस अधिनियमच्या कलम १४ अन्वये सदर मिळकत ही वादीच्या मालकीची होते. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ व २ हे वरकरणी मालक होतात. वादींचा दावा मिळकतीवर ताबा आहे. अशा परिस्थितीत वादीला दावा मिळकतीतुन निस्कासित केल्यास किंवा दावा मिळकत विक्री केल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. विद्वान संपरिक्षा न्यायालय यांनी वर नमुद बाबीकडे पुर्णत: दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे त्यांनी हा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. याउलट प्रतिवादी क्रमांक १ व २ तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. ठोकडे यांनी असा जोरदार युक्तिवाद केला कि, मुळात वादीला दावा मिळकतीबाबत मालकी नाही, वादीचा दावा मिळकतीवर ताबा नाही. त्यामुळे त्यांनी हा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

१४. मालमत्ता हस्तांतरण अधिनियमचे कलम ४१ मध्ये असे नमुद करण्यात आलेले आहे कि, जेव्हा एखादया स्थावर संपत्तीत हितसंबंधीत असलेल्या व्यक्तीच्या व्यक्त अथवा उपलक्षीत संमत्तीने एखादी व्यक्ती अशा संपत्तीची वरकरणी मालक असुन ती संपत्ती प्रतिफलर्थ हस्तांतरीत करील तेव्हा हस्तांतरक हस्तांतरण करण्यास प्राधीकृत नव्हता या कारणावरून ते शुन्यकरणीय असणार नाही. परंतु, हस्तांतरकास ते हस्तांतरण करण्याची शक्ती होती याची खात्री करून घेण्यासाठी वाजवी दक्षता घेवुन हस्तांतरीत सद्भावपुर्वक वागला पाहिजे.

१५. संचिकेवरील कागदपत्रे असे दर्शवितात की, दिनांक १७/०७/२०१३ रोजीच्या खरेदीखताअन्वये प्रतिवादी क्र. ३ यांनी गट

क्रमांक ३८ मधील पुर्वेकडील बाजूचे ५ हे ९ आर क्षेत्र बळवंत कोले यांच्याकडून विकत घेतलेले आहे. गोविंद दादाराव गाडेकर आणि विठ्ठल दादाराव गाडेकर यांनी प्रतिवादी क्र. ३ यांच्या हक्कात दिनांक १२/०२/२०१३ रोजी विशेष कुलमुत्यारपत्र निष्पादीत केलेले आहे. प्रतिवादी क्र. ३ यांनी दिनांक २५/०९/२०१३ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या हक्कात विना मोबदला बक्षिसपत्र निष्पादीत केलेले आहे. दावा मिळकतीच्या ७/१२ उता–यावर प्रतिवादी क्र. १ आणि २ यांच्या नावे १ हे ६० आर क्षेत्राची नोंद आहे.

१६. बक्षीसपत्रात प्रतिवादी क्र. ३ यांनी असे नमूद केले आहे की, दावा मिळकत ही त्यांची स्वकष्टार्जीत मालकीची असून विठ्ठल दादाराव गाडेकर आणि गोविंद दादाराव गाडेकर हे दोन भाऊ गट क्रमांक ३८ मधील शेतामध्ये पीकपाण्याची देखभाल करत होते व प्रतिवादी क्र. ३ यांचे विठ्ठल गाडेकर यांच्यासोबत स्नेहाचे संबंध होते. विठ्ठल गाडेकर आणि द्रुपदाबाई गाडेकर यांना मुले, मुली व वारस नाहीत. या दोन्ही वृध्द नवराबायकोचा त्यांच्या हयातीपर्यंत पालनपोषण औषधपाणी सर्वकाही खर्च करण्याच्या अटीवर प्रतिवादी क्र. ३ यांनी उत्तरेकडील चार एकर क्षेत्र प्रतिवादी क्र. १ व २ यांना विना मोबदला बक्षिस दिलेले आहे. त्याप्रमाणे त्यांनी सदर क्षेत्राचा ताबा प्रतिवादी क्र. १ व २ यांना दिलेला आहे. तसेच सदर बक्षीसपत्रात पुढे असे नमुद आहे कि, प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी देखील पुढे अशी हमी दिलेली आहे कि, त्यांचे काका आणि काकु नामे श्री विठ्ठल दादाराव गाडेकर व सौ. द्रुपदाबाई विठ्ठल गाडेकर यांचा मरेपर्यंत सांभाळ, त्याचे पालनपोषण, त्याचे आजारपण, औषधपाणी, कपडालत्ता, जेवणखान वगैरे सर्व काही खर्च

प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी करण्याचे असून सदर सर्व अटी शर्ती त्यांना मान्य, कबूल आहेत. या वर नमूद मुख्य अटी शर्तीवर प्रतिवादी क्रमांक ३ यांनी त्या दस्तात नमूद उत्तरेकडील चार एकर शेतजमीन त्यांना विनामोबदला बक्षीसपत्रान्वये दिलेली आहे व ती त्यांनी राजीखुशीने स्विकारलेली आहे.

१७. त्यामुळे संचिकेवरील या कागदपत्रांवरुन असे निदर्शनास येते कि, सदर मिळकत वादी आणि तिच्या पतीला मालकी हक्काने दिल्याबाबत या दस्तात काहीही नमूद केलेले नाही. प्रतिवादी क्र.३ यांनी दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ व २ यांना बक्षीस दिलेली आहे आणि वादी व तिचे पती विठ्ठल यांच्या पालनपोषणाची जबाबदारी प्रतिवादी क्र.१ व २ वर टाकली आहे. त्यामुळे हिंदु वारस अधिनियमच्या कलम १४ अन्वये दावा मिळकत ही वादीच्या मालकीची आहे आणि प्रतिवादी क्रमांक १ व २ हे वरकरणी मालक आहेत, असे म्हणता येत नाही.

१८. संचिकेचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र. ३ यांनी प्रतिवादी क्र. १ व २ आणि वादीच्या मुली सुमन आणि शांताबाई यांच्या विरुध्द दिनांक ०२.०३.२०१५ रोजी नियमित दिवाणी दावा क्र. २४४/२०१५ दाखल केला होता. त्या दाव्यात दिनांक २५.०९.२०१३ रोजीच्या नोंदणीकृत बक्षीसपत्र क्र. ५१५६/२०१३ मधील अटींचा प्रतिवादी क्र. १ आणि २ यांनी भंग केल्याचे आणि या बक्षीसपत्रातील अटीप्रमाणे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी विठ्ठल व द्रुपदाबाई यांना दुर्लक्षीत केल्याचे, सांभाळ करण्यास नकार दिल्याचे आणि त्यामुळे सदर बक्षीसपत्र बेकायदेशीर असल्याचे प्रतिवादी क्र. ३ सिध्द करु शकला नाही. त्यामुळे, सदर दावा हा गुणदोषारावर दिनांक २०.०२.२०२० रोजी रद्द झाला आहे. त्या विरुध्द

प्रतिवादी क्र. ३ यांनी दाखल केलेले नियमित दिवाणी अपिल क्र. ६५/२०२० हे २१.०२.२०२३ रोजी रद्द झालेले आहे. या दाव्यात वादी ही पक्षकार नाही. त्यानंतर, दिनांक २९.०४.२०२३ रोजी वादींनी हा दावा दाखल केला आहे. जरी काही क्षणांकरीता प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी वादीचा सांभाळ करण्यास नकार दिला असे गृहीत धरले तरीही त्याचा वादीला काहीही फायदा होणार नाही. कारण वर चर्चा केल्याप्रमाणे वादीला बक्षीसपत्राप्रमाणे केवळ उदरनिर्वाहाचे अधिकार दिलेले आहेत. बक्षीसपत्रात प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना ताबा दिल्याचा उल्लेख आहे. शिवाय दावा मिळकतीवर तिचा ताबा असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करण्यासाठी वादीने कसल्याही प्रकारचा पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे वादीने तिची प्रथमदर्शनी बाजु सिध्द केली आहे, असे म्हणता येत नाही. त्यामुळे सोईचा समतोल वादीच्या बाजुने असण्याचा आणि हा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे पैशाने कधीही न भरून येणारे नुकसान होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे तात्पुरता मनाईहुकुम पारीत करण्यास आवश्यक अशा तिन्ही घटकांची पुर्तता वादीने केलेली नाही. त्यामुळे वादी ही तिने मागणी केल्याप्रमाणे तात्पुरता मनाईहुकुम मिळण्यास पात्र नाही. त्यामुळे विद्वान संपरिक्षा न्यायालय यांनी पारीत केलेला आदेश हा योग्य आणि कायदेशीर आहे. त्यामुळे त्यात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे प्रस्तुत अपील रद्द करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे मुद्दे क्रमांक १ व २ यांचे उत्तर मी नकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्रमांक ३ च्या उत्तराच्या अनुषंगाने मी खालील आदेश पारीत करीत आहे.

# <u>आ दे श</u>

१. प्रस्तुत अपील रद्द करण्यात येते.

२. नियमित दिवाणी दावा क्रमांक ५५९/२०२३ मध्ये विद्वान सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर यांनी दिनांक ०९/१०/२०२३ रोजी निशाणी क्रमांक ५ वर पारीत केलेला आदेश कायम करण्यात येतो.

३. उभयपक्षकारांनी आपापला खर्च स्वत: सोसावा.

४. विद्वान संपरिक्षा न्यायालय यांना तसे कळवण्यात यावे.

PATIL OMSHANKAR SHIVRAJ

Digitally signed by PATIL OMSHANKAR SHIVRAJ
Date: 2026.07.21 16:18:11 +0530

**(ओमशंकर शिवराज पाटील)**

दिनांक – २१/०७/२०२६ तदर्थ जिल्हा न्यायाधीश – २, सोलापूर.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file judgment/order is same word to word as per the original judgment.

| | |
|---|---|
| (a) Name of the stenographer | - Y.V.Sital (Grade III) |
| (b) Court | - Adhoc D.J.2 Solapur. |
| (c) Date of Judgment/Order | - 21.07.2026 |
| (d) Judgment/Order signed by P.O. on | - 21.07.2026 |
| (e) Judgment/Order uploaded on | - 21.07.2026 |